# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-३३ दिनांक - ०५/०२/२०२४

## घरफोडी चोरी करणाऱ्या ०४ आरोपीतांना २४ तासाच्या आत अटक
## पेल्हार पोलीस ठाणे - गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगीरी.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत दिनांक.०१/०२/२०२४ रोजी रात्रौ ०८.३० वा. ते दिनांक ०२/०२/२०२४ रोजी सकाळी ०९.३० वाजताच्या दरम्यान फिर्यादी श्री. मिराज सिराज अहमद खान, वय- ३३ वर्षे, रा. वाकणपाडा, नालासोपारा पुर्व ता.वसई जि.पालघर यांच्या परमार टेक्नो सेंटर, वसई फाटा, वसई पुर्व ता.वसई जि.पालघर येथिल बंद गाळयाच्या शटरची कडी तोडुन त्यावाटे आत प्रवेश करुन फिर्यादी यांच्या गाळयातुन २,६८,८००/- रुपये किंमतीचे वेल्डींग रॉड, ग्रायडींग व कटींग व्हिल असा मुद्देमाल घरफोडी चोरी करुन चोरुन नेले बाबत फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पेल्हार पोलीस ठाणे येथे दिनांक ०३/०२/२०२४ रोजी २२:३१ वा. गु.र.क्र. I ११४/२०२४ कलम ४५४, ४५७, ३८०, भा.द.वी.स. प्रमाणे गुन्हा नोंद झाला आहे.

सदर गुन्हयाचे गार्भीर्य लक्षात घेऊन पेल्हार पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र वनकोटी यांनी तात्काळ गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी अंमलदार यांना गुन्हा उघडकीस आणण्याच्या अनुषंघाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानुसार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पोउपनिरी/ तुकाराम भोपळे व स्टाफ यांनी गुन्हयाचे घटनास्थळाला भेट देऊन घटनास्थळावरील, व आजुबाजुच्या परिसरातील सीसीटीव्ही कॅमेरे चेक करुन त्याव्दारे आरोपीत यांच्या बाबत माहिती घेतली. आरोपीत हे घरफोडी चोरी करुन भिवंडी येथे गेले असल्याबाबत प्राथमिक माहिती प्राप्त झाल्याने आरोपीत यांच्याबाबत गुप्त बातमीदार यांच्या मार्फत माहिती घेऊन आरोपीत यांचा तांत्रिकबाबींच्या आधारे शोध घेवुन इसम नामे — १) मेराज अली सनाउल्ला अन्सारी वय ३२ वर्ष, रा. नारपोली, भिवंडी जि.ठाणे २) अब्दुल रेहमान युसुफ शेख, वय ३० वर्ष, धामनकर नाका, नारपोली भिवंडी, जि.ठाणे ३) रामचंद्र किसन भंडारवार, वय ३० वर्ष, पद्मा नगर, नारपोली, भिवंडी जि.ठाणे ४) मोहमद खलील हनिफ अन्सारी, वय- ३६ वर्ष रा. धामनकर नाका, नारपोली भिवंडी जि. ठाणे मुळ रा. उत्तरप्रदेश यांना गुन्हयाचे तपास कामी ताब्यात घेऊन अटक करुन त्यांच्याकडे तपास करता त्यांनी आप आपसात संगणमत करुन गुन्हा केला असल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले. आरोपीत यांच्याकडुन गुन्हयातील गेला माल १०० टक्के हस्तगत करुन आरोपीत यांनी गुन्हा करण्याकरीता वापरलेला आयशर टेम्पो असा एकुण १२,६८,८००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन सदरचा गुन्हा २४ तासाच्या आत उघडकीस आणलेला आहे.

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त सो, परिमंडळ- ३, विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त सो, विरार विभाग, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. जितेंद्र वनकोटी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो, श्री. शिवानंद देवकर, पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. कुमारगौरव धादवड, पोलीस निरीक्षक (प्रशासन) पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे, तुकाराम भोपळे, पोलीस उप निरीक्षक, पोहवा/तानाजी चव्हाण, पो.अं./रवि वानखेडे, निखील मंडलिक, किरण आव्हाड, राहुल कर्पे, दिलदार शेख, अनिल साबळे, सुजय पाटील सर्व नेम. पेल्हार पोलीस ठाणे पोहवा/नामदेव ढोणे, पो.अं. संतोष खेमनर, नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय परिमंडळ ०३, मिभाववि पोलीस आयुक्तालय यांनी यशस्वीरित्या पार पाडली आहे.


पेल्हार पोलीस ठाणे
GOODS
CARRIER